छत्रपती संभाजीनगर । बीड । परभणी । लातूर । धाराशिव । नांदेड येथून एकाच वेळी प्रकाशित होणार दैनिक

दैनिक

# मराठवाडा दर्शन

बीड, छत्रपती संभाजीनगर,लातूर, धाराशिव, परभणी, जालना,नांदेड

मराठवाड्याचे प्रत्येक घडामोडीचे दर्पण

Mo.9028349999

E-Mail : marathwadadarshannews@gmail.com

MARATHWADA DARSHAN

संपादक : दत्तात्रय बालासाहेब हंडीबाग

**प्रतिनिधी पाहिजेत**

" दैनिक मराठवाडा दर्शनसाठी "
मराठवाड्यातील सर्व जिल्हे
तालुका, गावस्तरावर
प्रतिनिधी नेमणे आहेत.


:: संपर्क ::

MO.9028349999

बीड (महाराष्ट्र) | दैनिक | मराठी | वर्ष -०३ | अंक -२९७ | मंगळवार दि.२१ जुलै २०२६ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७७८५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | DAILY | MARATHI | Year-03 | Issue 297 | TUESDAY DT.21 JULY 2026 | RNI : MAHMAR/2023/87785 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# जंतर-मंतरवरील आंदोलनावर पोलिसांची कारवाई; लाठीमार, अश्रुधूराचा वापर






## सोनम वांकचुक यांनी नवी मागणी

सोनम वांगचुक यांनी सोशल मीडिया हँडल 'द' वर एक नवी पोस्ट केली आहे. यात त्यांनी उपोषण पुढेही सुरूच ठेवणार असल्याचे महटले आहे. ते म्हणाले, मी माझे उपोषण सुरूच ठेवणार आहे. शांततेने आंदोलन करणाऱ्या तरुणांवर होणारी क्रूरता बघता, जोवर या तरुण नेत्यांना संसदेत खासदारांना भेटण्याची परवानगी मिळत नाही अथवा मला येथे रुग्णालयात त्यांना भेटायची परवानगी मिळत नाही, तोवर मी माझे उपोषण सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

## पोलिसांच्या क्रूरतेनंतरही, आंदोलक जंतर मंतरवर परतले

कॉकरोच जनता पार्टी एक्सवरील एका पोस्टमध्ये असे लिहिले आहे, अभिजीत दीपक, सौरभ दास, आशुतोष रांका आणि गीतांजली आंगमो अजूनही जंतर मंतरवर आंदोलन करत आहेत. ते सध्या केरळ हाऊससमोर आहेत. हे शांततापूर्ण आंदोलन संपणार नाही. दिल्लीकरांनो, बाहेर पडा आणि जंतर मंतरवर आमच्यासोबत सामील व्हा - आता नाही तर कधीच नाही. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिलाच पाहिजे.

## आंदोलकांशी झालेल्या संघर्षात ५० हून अधिक पोलीस जखमी

पोलिसांच्या सूत्रांनुसार, सीजेपीच्या आंदोलकांशी झालेल्या संघर्षात ५० हून अधिक पोलीस जखमी झाले असून, त्यामुळे कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे.जखमी पोलिसांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, हिंसाचारानंतर पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली आहे.











**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**

जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या कॉकरोच जनता पक्षाच्या आंदोलनावर सोमवारी सकाळी पोलिसांनी मोठी कारवाई करत आंदोलनस्थळ रिकामे केले. आंदोलनासाठी उभारण्यात आलेले तंबू हटविण्यात आले असून आंदोलकांना तेथून हटविण्यात आले. या कारवाईदरम्यान पोलिसांनी लाठीमार केल्याचा आरोप करण्यात आला असून अनेक आंदोलक जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.

सोमवारी सकाळी सुमारे ८ वाजल्यापासून आंदोलनाला सुरुवात झाली. त्यानंतर सकाळी १० वाजण्याच्या सुमारास आंदोलकांनी पोलिसांचे बॅरिकेड्स तोडून संसद भवनाच्या दिशेने मोर्चा काढला. पोलिसांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. काही आंदोलक संसद परिसराच्या जवळ पोहोचल्याने सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली.संसद परिसरात प्रवेश करण्याचा प्रयत्न झाल्याच्या पार्श्वभूमीवर संसदेच्या मुख्य प्रवेशद्वारावरील सुरक्षा वाढविण्यात आली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी अश्रुधूराच्या नळकांड्यांचा वापर केला. त्यानंतर गर्दी पांगली आणि परिसरातील परिस्थिती हळूहळू नियंत्रणात आली.दरम्यान, कॉकरोच जनता पक्षाने आपले नेते अभिजीत दीपके यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याचा दावा केला. मात्र, पोलिसांनी हा दावा फेटाळून लावत कोणालाही ताब्यात घेतले नसल्याचे स्पष्ट केले.या गोंधळाच्या काळात संसदेचे कामकाज सुरू होते. पंतप्रधानांसह सर्व खासदार संसदेत उपस्थित होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून संसद परिसरात अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला.

## ही संसद त्यांचीच आहे, कोणाच्या बापाची जहागिरी नाही

### प्रियंका गांधी तरुणांवरील लाठीहल्ल्यानंतर संतापल्या



तुम्ही त्यांच्याशी चर्चा करण्याऐवजी मुलांना मारत आहात, कशासाठी? ही संसद त्यांचीच आहे. कोणाच्या बापाची जहागिरी नाहीये, अशा शब्दात कॉंग्रेस खासदार प्रियंका गांधी यांनी केंद्र सरकारवर संताप व्यक्त केला.

दिल्लीतकॉक्रोच जनता पार्टीने सोमवारी जंतर-मंतर ते संसद भवन मोर्चाची हाक दिली होती. देशभरातून तरुण दिल्लीत दाखल झाले होते. गर्दी वाढत गेल्यानंतर पोलिसांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र, गर्दी वाढत जाऊन तरुण आक्रमक झाले. त्यानंतर बळाचा वापर करण्यात आला. तरुणांवर लाठीहल्ला केल्याच्या प्रकारावर खासदार प्रियंका गांधी यांनी संताप व्यक्त केला. हा खूप मुर्खपणा आहे. आपलीच मुले आहेत. या देशाचे भविष्य आहे. ही संसद त्यांचीच आहे. कोणाच्या बापाची जहागिरी नाही. राहुल गांधी बऱ्याच काळापासून हा मुद्दा मांडत आहेत. तुम्ही तरुणांशी चर्चा करण्याऐवजी त्यांना मारहाण करत आहात, कशासाठी करत आहात?, असा सवाल खासदार प्रियंका गांधी यांनी केला.

## १५२ प्रश्नपत्रिका फुटल्या, ७ कोटी विद्यार्थी त्रस्त; शिक्षा मात्र विद्यार्थ्यांनाच - राहुल गांधीं

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**

नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहार आणि प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणावरून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत 'कॉकरोच जनता पार्टी'च्या वतीने सोमवारी नवी दिल्लीत आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात विद्यार्थी, पालक आणि विविध सामाजिक संघटनांसह हजारो नागरिक सहभागी झाले.

आंदोलनादरम्यान पक्षाच्या शिष्टमंडळाने केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांची भेट घेऊन तीन प्रमुख मागण्या सादर केल्या. त्यामध्ये केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहारामुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक कोटी रुपयांची आर्थिक मदत द्यावी आणि प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी, अशा मागण्यांचा समावेश होता. चर्चा झाल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.



दरम्यान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या प्रकरणावरून केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. सामाजिक माध्यमावरील पोस्टमध्ये त्यांनी शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी पुन्हा करत, अनेक प्रश्नपत्रिका फुटल्याने कोट्यवधी विद्यार्थ्यांवर परिणाम झाला, मात्र दोषींवर प्रभावी कारवाई झाली नाही, असा आरोप केला. तसेच आंदोलनकर्त्यांवरील पोलिस लाठीमार आणि अटक कारवाईबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली.

## पांडुरंगाच्या कृपेमुळे बोअर पंपा ला लागले पाणी

दावरवाडी ।प्रतिनिधी

सालवाडगाव विहामांडवा सर्कल ता.पैठण येथून दि. ८ जुलै रोजी चंद्रसेन महाराज यांच्या मार्गदर्शना खाली पंढरपूर येथील आषाढी महा उत्सवात सहभागी होण्यासाठी दोनशे वारकऱ्यांची पायी दिंडी निघाली बीड जिल्ह्यातील पाटोदा परीसरातील बांगर वस्तीजवळ दिंडी चे स्वागत करण्यात आले

बांगर वस्तीतील ग्रामस्थ यांनी चंद्रसेन महाराज यांच्याकडे आग्रह धरला की दिंडी तील वारकऱ्यांसाठी व गावकऱ्यांसाठी सार्वजनिक पिण्याच्या पाण्यासाठी बोअर पम्प सुरु करण्याची इच्छा आहे व योग्य जागेसाठी चंद्रसेन महाराज यांच्याकडे आग्रह धरला महाराजांजी योग्य जागा दाखविली गावाकरांनी तेथे बोअर पम्प उभारणीचा निर्णय घेतला आणि बोअर पंपातुन पाणी बाहेर पडले गावकर्यांनी जलमातेचा जयजयकार केला




पांडुरंगाच्या कृपेमुळे पाणी लागले असे या वेळी चंद्रसेन महाराज म्हणाले बोअर पंपाचे पूजन सामाजिक कार्यकर्ते योगेश जोशी यांच्या हस्ते पूजन झाले या वेळी बाळासाहेब बोडखे, नारायण गाभूड, नामदेव जगताप, बाबासाहेब ठोंबरे, अनिल जाधव या सह ग्रामस्थांनी जला ची उधळण करून पांडुरंगाचा जयजयकार केला.

## रोहिलागड फाट्यावर आमदार कुचे यांच्या ताफ्यातील वाहनाचा अपघात रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

जामखेड ।प्रतिनिधी


अंबड तालुक्यातील जामखेड येथील रोहिलागड फाटा पुन्हा एकदा भीषण अपघातामुळे चर्चेत आला आहे. बदनापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार नारायण कुचे यांच्या वापरातील वाहनाचा सोमवारी दि. २० पहाटे सुमारे ४.४५ वाजता अपघात झाला. या दुर्घटनेत आमदारांचे अंगरक्षक दत्तात्रय सवडे भाजपचे जालना जिल्हा सरचिटणीस अनिल कोलते पाटील आणि वाहनचालक किरकोळ जखमी झाले. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.मिळालेल्या माहितीनुसार आमदार नारायण कुचे यांचा ताफा छत्रपती संभाजीनगरहून पंढरपूरकडे रवाना झाला होता. दरम्यान, सहकाऱ्याच्या कुटुंबीयांना बदनापूर येथून घेण्यासाठी एमएच-२१-बीएफ-५२०० क्रमांकाचे वाहन रोहिलागड फाट्यावरून बदनापूरच्या दिशेने जात असताना अपघातग्रस्त झाले.

घटनेची माहिती मिळताच आमदार कुचे तातडीने घटनास्थळी दाखल झाले. कार्यकर्त्यांच्या मदतीने जखमींना वाहनातून बाहेर काढून जालना येथील कलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले. जखमींवर उपचार सुरू असून सर्वांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आमदार कुचे यांनी दिली. अपघातात वाहनाच्या पुढील व मागील भागाचे मोठे नुकसान झाले आहे.

सहा-सात वर्षांपासून अपघातांचे केंद्र

रोहिलागड फाटा हा गेल्या सहा-सात वर्षांपासून जिल्ह्यातील अपघातप्रवण ठिकाण म्हणून ओळखला जात आहे. तीव्र वळण, दिशादर्शक फलकांचा अभाव, गतीरोधक नसणे अपुरे रिफ्लेक्टर आणि रात्रीच्या वेळी कमी दृश्यमानता यामुळे येथे वारंवार अपघात होत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. या ठिकाणी एक-दोन दिवसाआड लहान-मोठे अपघात घडत असून अनेकांना यापूर्वी जीवही गमवावा लागला आहे.

रोहिलागड फाट्यावर गतीरोधक, दिशादर्शक फलक, रिफ्लेक्टर, इशारा दिवे आणि इतर सुरक्षाविषयक सुविधा उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि वृत्तपत्रांनी वेळोवेळी हा प्रश्न उपस्थित



केला असला तरी संबंधित विभागाकडून कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेल्या नसल्याची खंत नागरिक व्यक्त करत आहेत.विशेष म्हणजे याच मतदारसंघाचे आमदार नारायण कुचे यांच्या वापरातील वाहनालाच या अपघातप्रवण ठिकाणी अपघात झाल्याने रोहिलागड फाट्यावरील रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या घटनेनंतर तरी सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित यंत्रणा तातडीने उपाययोजना करून या ठिकाणाला सुरक्षित बनवणार का, याकडे जामखेड परिसरातील ग्रामस्थांसह संपूर्ण बदनापूर विधानसभा मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.

# शिबिराच्या यशस्वीतेसाठी सर्व विभागांनी समन्वयाने कामे करावीत - जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड (जिमाका)

जिल्ह्यात ६ व ७ ऑगस्ट २०२६ रोजी आष्टी येथील अनिषा ग्लोबल स्कूल मैदानावर मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रुग्णांची यादी तयार करताना आशा कार्यकर्त्या आणि अंगणवाडी सेविकांची मदत प्राधान्याने घेण्यात यावी. तसेच या शिबिरामुळे जिल्ह्यातील हजारो रुग्णांना मोफत उपचार मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त गरजू रुग्णांपर्यंत वैद्यकीय मदत पोहोचविण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कामे करावीत. असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले.



मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराची पूर्वतयारी आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आज पार पडली. या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे राज्य समन्वयक रितेश पाटील, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश चव्हाण, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.शेख रौफ, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष जिल्हा प्रमुख डॉ.चैतन्य कागदे यांच्यासह आरोग्य तसेच महिला व बालविकास विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराच्या आयोजनामध्ये केंद्र शासन आणि राज्य शासन पुरस्कृत विविध आरोग्य विषयक योजनांबाबत व्यापक जनजागृती, जनप्रबोधन तसेच चिकित्सा सेवा आदिचा समावेश असणार आहे. त्यामुळे या शिबिराच्या यशासाठी पूर्वतयारी अत्यंत महत्त्वाची असून, पदनिहाय विविध समित्या स्थापन करून जबाबदाऱ्यांचे वाटप करावे, तसेच दररोज माहिती अद्ययावत करावी. आणि दि.२२ जुलै २०२६ रोजी चांगला कार्यक्रम पार पाडावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.


मुख्यमंत्री महाआरोग्य शिबीरासाठी मुख्यमंत्री सहायता निधी कक्षासह संलग्नित असलेली सर्व रुग्णालये, धर्मादाय रुग्णालये, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना संलग्नित रुग्णालये, जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त असलेली रुग्णालये व स्टेमी तसेच एचएलएच यंत्रणा, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ संलग्नित सर्व वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये, अन्न व औषधी प्रशासन आणि जिल्ह्यातील सर्व सेवाभावी संस्था इत्यादी यंत्रणांचे सहकार्य घेवून मुख्यमंत्री महाआरोग्य शिबीराचे आयोजन कर ण्यात येणार आहे. या शिबीराचे संयोजक आमदार सुरेश धस हे असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे. अशी माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे राज्य समन्वयक रितेश पाटील यांनी यावेळी दिली.

मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराचे तीन टप्पे पाडण्यात आले असून प्रथम टप्प्यात निदान झालेल्या रुग्णांची यादी तयार कर ण्यात येणार आहे. दुसऱ्या टप्प्यात नवीन रुग्णांच्या तपासण्या करुन निदान करावयाचे आहे. तर तिसऱ्या टप्प्यात प्रत्यक्ष दि. ६ व ७ ऑगस्ट २०२६ रोजी आष्टी येथील अनिषा ग्लोबल स्कूल मैदानावर मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराचे आयोजन केले जाणार आहे. या मुख्य शिबिरात नाव नोंदणी विभाग, प्राथमिक तपासणी विभाग, नाक-कान-घसा विभाग, श्वसन रोग विभाग, नेत्रविकार विभाग, होमिओपॅथी विभाग, आयुर्वेद विभाग, फिजिओथेरेपी विभाग, मेडिसीन विभाग, हिरकणी कक्ष, रक्त संकलन विभाग, मेंदू विकार विभाग, कृत्रिम अवयव विभाग, त्वचा रोग विभाग, अस्थिरोग विभाग, अस्थिरोग विभाग, स्त्रिरोग विभाग, हृदय रोग विभाग, बालरोग विभाग, जनरल सर्जरी विभाग, दंतरोग विभाग, कर्करोग विभाग, मानसिक रोग विभाग, मुत्र विकार विभाग, किडणी रोग विभाग, प्राथमिक तपासणी (महिला), चौकशी कक्ष आणि रुग्ण संदर्भित कक्ष आदि विभाग शिबिराच्या मुख्य ठिकाणी असणार आहेत. असेही यावेळी सांगितले.

# १० वर्षांत देशांतर्गत पर्यटकांमध्ये १२९ टक्क्यांची विक्रमी वाढ

## जागतिक पर्यटनात भारताची मोठी झेप; खा.बजरंग सोनवणे यांच्या प्रश्नाला केंद्रीय पर्यटन मंत्र्यांचे लेखी उत्तर; परदेशी पर्यटकांचा आकडाही २ कोटींच्या पार

बीड / मागील १० वर्षांत देशांतर्गत पर्यटकांमध्ये १२९ टक्क्यांची विक्रमी वाढ झाली असल्याची माहिती केंद्रीय पर्यटन मंत्री यांनी दिली आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी विचारलेल्या प्रश्नावर हे उत्तर दिले आहे.



पर्यटन क्षेत्रातील पायाभूत सुविधा आणि कोट्यवधींच्या निधीनंतरही भारताचे पर्यटन क्षेत्र जागतिक पातळीवर अपेक्षित क्षमता गाठू शकले आहे का, असा सवाल बीडचे राष्ट्रवादी कॉँग्रेसचे (शरदचंद्र पवार पक्ष) खा.बजरंग सोनवणे यांनी लोकसभेत उपस्थित केला. खा.सोनवणे यांनी लोकसभा अतारांकित प्रश्न द्वारे देशातील पर्यटनाच्या उणिवा आणि जागतिक तुलनात्मक अभ्यासाबाबत सरकारला धारेवर धरले होते. यावर केंद्रीय पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी लेखी उत्तर देत, गेल्या दशकभरात भारताने पर्यटन क्षेत्रात मारलेल्या ऐतिहासिक भरारीची आकडेवारीच सभागृहासमोर ठेवली. केंद्रीय मंत्र्यानी स्पष्ट केले , २०१४ मध्ये भारताला भेट देणाऱ्या आंतरराष्ट्रीय पर्यटकांची संख्या १.३१ कोटी होती, ती २०२४ मध्ये ५६.९३ टक्क्यांनी वाढून २.०६ कोटींवर पोहोचली आहे. तर देशांतर्गत पर्यटनात तब्बल १२९.६० टक्क्यांची विक्रमी वाढ झाली असून, पर्यटकांचा आकडा १२८.२८ कोटींवरून थेट २९४.५३ कोटींवर गेला आहे. जागतिक पातळीवरील भारताच्या स्थानाचा दाखला देताना मंत्र्यांनी सांगितले की, संयुक्त राष्ट्रांच्या 'वर्ल्ड टूरिझम बॅरोमीटर २०२६' नुसार, जागतिक पर्यटनातील भारताचा वाटा १.१५ टक्क्यांवरून १.४१ टक्के झाला आहे. तसेच, जागतिक प्रवास आणि पर्यटन विकास निर्देशांकात भारताने ११९ देशांमध्ये ३९ वे स्थान पटकावले असून, सार्क देशांमध्ये आपले अव्वल स्थान कायम राखले आहे.

'स्टेट टूरिझम परफॉर्मन्स फ्रेमवर्क'

१ पर्यटन क्षेत्रातील त्रुटी आणि कनेक्टिव्हिटीच्या उणिवा ओळखण्यासाठी सरकारने 'स्टेट टूरिझम परफॉर्मन्स फ्रेमवर्क' विकसित केला असल्याचे शेखावत यांनी स्पष्ट केले. आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी जागतिक पर्यटन प्रदर्शनांमधील सहभाग, परदेशी टूर ऑपरेटरसाठी परिचय दौरे, इंडिया फूड फेस्टिव्हल आणि सोशल मीडियाद्वारे विविध पर्यटनस्थळांचे जागतिक स्तरावर जोरदार प्रमोशन केले जात आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी उपस्थित केलेल्या या प्रश्नामुळे देशातील पर्यटन विकासाच्या धोरणांवर पुन्हा एकदा राष्ट्रीय पातळीवर मोठी चर्चा सुरू झाली आहे.



# कर्तव्यनिष्ठ शिपाई अंजाबापू हंबर्डे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

मान्यवरांकडून हंबर्डे कुटुंबीयांची सांत्वनपर भेट; दुःखात सहभागी होत हळहळ व्यक्त

आष्टी (अण्णासाहेब साबळे): आष्टी कृषी उत्पन्न बाजार समिती मार्केट यार्ड येथील कर्तव्यनिष्ठ व मनमिळावू शिपाई श्री. अंजाबापू हंबर्डे यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या निधनामुळे हंबर्डे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, विविध मान्यवरांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देत कुटुंबीयांचे सांत्वन केले.

कृषी बाजार समिती कडा सभापती रमजान शेख तांबोळी, मा.उपसभापती गौतम नाना आजबे, संचालक अशोक लगड, सुजित ढोबळे, पत्रकार अण्णासाहेब साबळे, के. के. काकडे आदींनी दिवंगत अंजाबापू हंबर्डे यांचे चिरंजीव अशोक हंबर्डे, अमोल हंबर्डे, त्यांच्या पत्नी, भाऊ साधू हंबर्डे तसेच संपूर्ण हंबर्डे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांच्या दुःखात सहभागी होत सांत्वन केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी अंजाबापू हंबर्डे यांच्या साध्या, सेवाभावी व कर्तव्यदक्ष व्यक्तिमत्त्वाच्या आठवणींना उजाळा दिला. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सेवेत त्यांनी प्रामाणिकपणे व निष्ठेने केलेल्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला. त्यांच्या निधनाने बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील एक कर्तव्यनिष्ठ व विश्वासू सहकारी हरपल्याची भावना व्यक्त करण्यात आली.दिवंगत अंजाबापू हंबर्डे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना उपस्थितांनी ईश्वर चरणी प्रार्थना केली की, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो तसेच हंबर्डे कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याचे बळ प्राप्त होवो.या सांत्वन भेटीप्रसंगी परिसरात शोकमय वातावरण निर्माण झाले होते.

## का कमी झाली अयोध्येतील भाविकांची गर्दी ?

# श्रद्धेला भ्रष्टाचाराचा तडा गेला की इतर कारणेही आहेत ??

विशेष लेख । प्रशांत बाफना

अयोध्या हे केवळ एक शहर नाही, तर कोट्यावधी हिंदूंच्या श्रद्धेचे, आस्थेचे आणि सांस्कृतिक अस्मितेचे केंद्र आहे. प्रभू श्रीराम हे भारतातील असंख्य हिंदू बांधवांचे आराध्य दैवत आहेत. शेकडो वर्षांच्या संघर्षानंतर अयोध्येत श्रीराम मंदिराची उभारणी झाली आणि प्राणप्रतिष्ठेचा ऐतिहासिक सोहळा संपूर्ण जगाने पाहिला. त्या क्षणी अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू होते.

मंदिर सर्वसामान्य भाविकांसाठी खुले झाल्यानंतर सुरुवातीच्या काही महिन्यांत लाखो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली. दर्शनासाठी तासंतास , कधी कधी दोन-दोन दिवस प्रतीक्षा करावी लागत होती. अयोध्येचा चेहरामोहरा बदलला. नवीन रस्ते, पार्किंग, धर्मशाळा, हॉटेल्स, व्यापारी संकुले आणि इतर सुविधा उभारल्या गेल्या. स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठी चालना मिळाली.

मात्र आता काही माध्यमांतील वृत्ते आणि स्थानिक व्यापाऱ्यांच्या प्रतिक्रिया पाहता, पूर्वीच्या तुलनेत भाविकांची संख्या काही काळ कमी झाल्याची चर्चा सुरू आहे. यामागे नेमके कारण काय, हा प्रश्न उपस्थित होत आहे.काही ठिकाणी मंदिर ट्रस्टच्या आर्थिक व्यवहारांबाबत, देणगी व्यवस्थापनाबाबत किंवा कथित अनियमिततांबाबत आरोप झाले आहेत. अशा आरोपांची चौकशी संबंधित यंत्रणांनी करणे आणि सत्य जनतेसमोर आणणे आवश्यक आहे. मात्र, कोणताही आरोप न्यायालयीन किंवा अधिकृत चौकशीत सिद्ध होईपर्यंत त्याला अंतिम सत्य मानणे योग्य ठरणार नाही.

भाविकांच्या गर्दीतील बदलामागे इतर कारणेही असू शकतात. प्रारंभी प्राणप्रतिष्ठेनंतर निर्माण झालेली प्रचंड उत्सुकता, त्यानंतरचा नैसर्गिक ओघ कमी होणे, उन्हाळा, पावसाळा, प्रवासाचा खर्च, सुट्ट्यांचे नियोजन आणि हंगामी पर्यटन यांचाही परिणाम भाविकांच्या संख्येवर होऊ शकतो.तथापि, श्रद्धेच्या केंद्रस्थानी असलेल्या कोणत्याही संस्थेबाबत आर्थिक पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित झाले, तर त्याचा परिणाम जनमानसावर होणे स्वाभाविक आहे. मंदिर असो किंवा कोणतीही धार्मिक संस्था- देणगीचा प्रत्येक रुपया हा भाविकांच्या विश्वासाचा असतो. त्यामुळे आर्थिक व्यवहार पूर्णपणे पारदर्शक असणे ही केवळ कायदेशीर नव्हे तर नैतिक जबाबदारीही आहे.

जर कोणत्याही प्रकारच्या अनियमितता झाल्या असतील, तर निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. त्याचबरोबर जर आरोप निराधार असतील, तर तेही अधिकृतपणे स्पष्ट झाले पाहिजे. कारण अफवा आणि संशय यामुळेही श्रद्धेला धक्का बसू शकतो.


अयोध्या ही केवळ एका पक्षाची किंवा सरकारची नाही; ती संपूर्ण देशाच्या श्रद्धेचे प्रतीक आहे. त्यामुळे या पवित्र स्थळाची प्रतिष्ठा कायम राखणे, भाविकांचा विश्वास अबाधित ठेवणे आणि व्यवस्थापनात पूर्ण पारदर्शकता आणणे ही सर्व संबंधितांची सामूहिक जबाबदारी आहे.

देवावरील श्रद्धा अबाधित राहिली पाहिजे; पण देवाच्या नावाने चालणाऱ्या प्रत्येक व्यवस्थेनेही जनतेच्या विश्वासाला पात्र ठरले पाहिजे. श्रद्धा आणि पारदर्शकता यांचा संगमच कोणत्याही तीर्थक्षेत्राचे खरे वैभव असते

# समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

## भरधाव ट्रकची कारला धडक, ६ जणांचा जागीच मृत्यू

समृद्धी महामार्गावर भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये ६ जणांचा जागीच मृत्यू झाला. भरधाव ट्रकने कारला पाठीमागू जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की या अपघातामध्ये कारचा चुराडा झाला. कारमध्ये असणारे चौघे आणि ट्रकमध्ये असणारे दोघे गंभीर जखमी झाले. या सर्वांनी जागीच प्राण सोडले. या अपघातानंतर समृद्धी महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, वर्धामध्ये समृद्धी महामार्गांवर भीषण अपघात झाला. कारला पाठीमागून ट्रकने धडक दिली. या अपघातामध्ये सहा जणांचा मृत्यू झाला. पुलगांव पोलिस ठाण्याच्या अंतर्गत येणाऱ्या विरूळ इंटरचेंजजवळ ही अपघाताची घटना घडली. पुण्यावरून मुलीचे ॲडमिशन करून नागपूरला जात असलेल्या कुटुंबावर काळाने घाला घातला. कारमधील चालकासह तिघांचा मृत्यू झाला. तर ट्रॅकमधील चालक आणी क्लीनरचाही अपघातामध्ये मृत्यू झाला.

समृद्धी महामार्गांवर रात्री दरम्यान इथेनॉलचा एक ट्रक पलटी झाला होता म्हणून वाहतूक डायवर्ट केली होती. त्यात वाहतूक थांबली असताना मागून भरधाव वेगाने आलेल्या ट्रकने कारला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की कार ट्रॅकच्या खाली चिरडली गेली आणि ट्रकला आग लागली. ट्रक मिरची घेऊन जात होता. अपघात इतका भीषण होता की कारचा चुराडा झाला आणि ट्रक जळून खाक झाला.

या अपघातानंतर मध्यरात्रीपासून समृद्धी महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली आहे. समृद्धी महामार्ग पोलिस आणि पूलगांव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे. हा अपघात नेमका कसा झाला याचा तपास पोलिस करत आहेत. वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न पोलिसांकडून सुरू आहे. या अपघातामध्ये मृत्यू झालेल्या सर्वांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी पुलगाव येथील रुग्णालयात पाठवण्यात आले आहे.

# शिर्डीत साईबाबा मंदिर गेटसमोर महिलेची हत्या चाकूने सपासप वार । दोन महिला आरोपींना अटक

**अहिल्यानगर । प्रशांत बाफना**

**शिर्डी साईबाबा मंदिराच्या गेटसमोर भयंकर हत्याकांडाची घटना घडली. साईबाबा मंदिर परिसरात स्टिकर आणि फळे विकणाऱ्या महिलांच्या एका गटाने दुसऱ्या एका फळ विक्रेत्या महिलेवर चाकूने वार करत तिची हत्या केली. रविवारी रात्री ही हत्येची घटना घडली. साई मंदिराच्या प्रवेशद्वार क्रमांक ४ समोर भर गदत महिलेवर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या जयश्री साईनाथ क्षीरसागर (३० वर्षे) या महिलेचा मृत्यू झाला. याप्रकरणी २ फळ विक्रेत्या महिलांना शिड पोलिसांनी अटक केली.**

मिळालेल्या माहितीनुसार, साई मंदिर परिसरात वर्दळीच्या ठिकाणी चार ते पाच महिलांनीच दुसऱ्या महिलेवर धारदार चाकूने वार करून हत्या केली. या घटनेमुळे मंदिर परिसरात गोंधळाचे वातावरण होते. फळे विकण्यासाठी उभं राहण्याच्या किरकोळ कारणाहून झालेला वाद थेट चाकू हल्ल्यापर्यंत पोहचल्याची प्राथमिक माहिती आहे. भररस्त्यात आरोपी महिलांनी जयश्री यांच्यावर चाकूने सपासप वार केले. या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या. त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याठिकाणी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी शिड पोलिस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंजली खांडीझोड (२२ वर्षे) आणि फिजा पटेल (२१ वर्षे) या दोन महिला आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. शिर्डीत आता तरुणांच्या टोळक्यांसह महिलांचा गुंडराज सुरू झालाय का? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. या हल्ल्यामागचे कारण अद्याप समजू शकले नाही. मात्र गुंड प्रवृत्तीच्या काही महिला हातविक्रेत्यांमुळे साई भक्तांच्या सुरक्षेचा प्रश्न देखील ऐरणीवर आला असल्याची चर्चा होत आहे. याप्रकरणी शिर्डी पोलिसांमध्ये गुन्हा दाखल करत दोन महिलांना ताब्यात घेतले. पोलिस सध्या तपास करत आहेत

# बीड नगर परिषदेतील नगरसेवक सुरज चुंगडे यांचे जात प्रमाणपत्र अवैध

बीड (प्रतिनिधी)

बीड नगरपरिषदेच्या २०२५ च्या निवडणुकीत विमुक्त जाती (अ) प्रवर्गातून निवडून आलेले शिंदे सेनेचे नगरसेवक सूरज जयसिंग चुंगडे यांना मोठा राजकीय धक्का बसला आहे. जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीड यांनी त्यांचा विमुक्त जाती (अ) प्रवर्गाचा दावा फेटाळून लावत ११ डिसेंबर २००७ रोजी जारी करण्यात आलेले जात प्रमाणपत्र अवैध ठरवून ते जप्त करण्याचे आदेश दिले आहेत.

समितीने दिलेल्या आदेशानुसार, महाराष्ट्र जात प्रमाणपत्र नियम, २०१२ नुसार विमुक्त जाती प्रवर्गासाठी २१ नोव्हेंबर १९६१ ही प्रभावी तारीख मान्य आहे. सुनावणीदरम्यान तसेच समितीकडे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांच्या तपासणीत सूरज चुंगडे यांना १९६१ पूर्वीचे कोणतेही महसुली अथवा शैक्षणिक पुरावे सादर करता आले नाहीत.

तसेच दक्षता पथकाच्या तपासणीत त्यांच्या वडिलांचे व काकांचे शालेय अभिलेख तपासण्यात आले असता त्यामध्ये 'हिंदू राजपूत' अशी जात नोंद आढळली. ही नोंद विमुक्त जाती (अ) प्रवर्गात येत नसल्याचे समितीने नमूद केले आहे.

याशिवाय, चुंगडे यांनी सादर केलेले नातेवाईकाचे जातवैधता प्रमाणपत्रही समितीने ग्राह्य धरले नाही. संबंधित व्यक्तीशी रक्तसंबंध सिद्ध करणारी अधिकृत वंशावळ सादर करण्यात अपयश आल्याने तो पुरावा अमान्य करण्यात आला.

या निर्णयामुळे बीड नगरपरिषदेतील त्यांच्या नगरसेवकपदासह पुढील कायदेशीर आणि राजकीय घडामोडींवर लक्ष लागले आहे.

जात प्रमाणपत्र जप्त करण्याचे आदेश

बीड नगरपरिषदेचे शिंदे सेनेचे नगरसेवक सूरज जयसिंग चुंगडे यांचा विमुक्त जाती (अ) प्रवर्गाचा जातदावा जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीड यांनी फेटाळला आहे. समितीचे अध्यक्ष शरद कुलकर्णी, सदस्य उमेश सोनवणे आणि सदस्य-



सचिव श्रावस्ती मेश्राम यांनी प्रकरणातील सर्व कागदपत्रे, पुरावे आणि तपास अहवालाचा सखोल विचार करून हा निर्णय दिला.

समितीने दिलेल्या आदेशानुसार, उपविभागीय अधिकारी, बीड यांनी सूरज चुंगडे यांना जारी केलेले जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आले असून ते तात्काळ जप्त करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# प्रा. मोतेकर लिखित बेसिक केमिस्ट्री पुस्तकाचे प्रकाशन

माजलगाव : (प्रतिनिधी)

सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाचे प्रा.श्रीनिवास चंद्रमोली मोतेकर लिखित 'बेसिक केमिस्ट्री-खख' या शैक्षणिक पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



प्रा. श्रीनिवास चंद्रमोली मोतेकर यांचे ''बेसिक केमिस्ट्री-खख' हे पुस्तक बी.एस्सी. च्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्यात आले असून यामध्ये रसायनशास्त्र विषयातील मूलभूत संकल्पना सोप्या व सुलभ पद्धतीने मांडण्यात आल्या आहेत. स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील रसायनशास्त्र विषयातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासाठी सदरील पुस्तक उपयुक्त ठरणार आहे. या पुस्तकात नवीन अभ्यासक्रमतानुसार प्रोटीन्स, व्हिटॅमिन्स आणि हार्मोन्सची रचना व महत्त्व, औषध निर्मितीचे नियम, फार्माकोलॉजी आणि विविध औषधांचे वर्गीकरण, सिड-बेस सिद्धांतांसह सुपरसिड्स आणि सुपरबेसेसची सविस्तर माहितीचा समावेश करण्यात आला आहे.पुस्तक निर्मितीसाठी पुणे येथील शास्त्रज्ञ डॉ. सुधीर एस. अर्बुज यांचे विशेष सहकार्य लाभले .

प्रकाशन सोहळ्या प्रसंगी प्र.प्राचार्य डॉ. एन. के. मुळे, माजी प्राचार्य डॉ. जी.के. सानप,उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रा.प्रकाश गवते,उपप्राचार्य प्रा.पवनकुमार शिंदे, विभागप्रमुख डॉ शंकर इप्पर, डॉ. ओमप्रकाश सारगे, डॉ.सतीश डाके, डॉ. सुदर्शन स्वामी, डॉ.सुहास गवळी, डॉ.अर्चना कचरे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

# नैताळे येथील उपक्रमशील शिक्षक नवनाथ खरे यांनी आपल्या मातोश्रींच्या स्मृतीप्रीत्यर्थ राबविला अभिनव उपक्रम

## दुखवट्याऐवजी स्वीकारली पुस्तकांची भेट

निफाड प्रतिनिधी

एखाद्या व्यक्तीच्या निधनानंतर होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये दुखवटे देण्याची परंपरा समाजात रूढ आहे. मात्र, या परंपरेला विधायक दिशा देत नैताळे येथील रहिवासी व सध्या कोळगाव येथील माळचारी शाळेत कार्यरत उपक्रमशील शिक्षक नवनाथ खरे यांनी आपल्या मातोश्रींच्या स्मृतिप्रीत्यर्थ एक प्रेरणादायी उपक्रम राबविला. जलदान विधीच्या निमंत्रण पत्रिकेत 'दुखवटे नकोत, एक पुस्तक आणा' असे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत तब्बल १३७ पुस्तके भेट दिली.

नवनाथ खरे यांच्या मातोश्री स्व. मिराबाई छबू खरे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या जलदान विधीच्या कार्यक्रमासाठी छापण्यात




आलेल्या निमंत्रण पत्रिकेत 'कोणत्याही प्रकारचे दुखवटे स्वीकारले जाणार नाहीत. इच्छुकांनी पुस्तक भेट द्यावे' अशी नम्र विनंती करण्यात आली होती. या आगळ्यावेगळ्या संकल्पनेने परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. रविवारी, दि.१९ जुलै रोजी पार पडलेल्या जलदान विधीला नातेवाईक, मित्रपरिवार, सहकारी शिक्षक, माजी विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी विविध विषयांवरील पुस्तके भेट देत उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला. या माध्यमातून एकूण १३७ पुस्तकांचे संकलन झाले.

आजच्या मोबाईल आणि सोशल मीडियाच्या युगात वाचन संस्कृती कमी होत असल्याची खंत व्यक्त केली जात असताना, दुःखाच्या प्रसंगालाही समाजोपयोगी स्वरूप देण्याचा खरे कुटुंबाचा हा प्रयत्न सर्वत्र कौतुकाचा विषय ठरला आहे. या उपक्रमाची चर्चा नैताळे परिसरासह सामाजिक माध्यमांवरही मोठ्या प्रमाणावर होत आहे. संकलित करण्यात आलेल्या पुस्तकांचा उपयोग भविष्यात विद्यार्थ्यांसाठी, गावातील वाचन चळवळीसाठी तसेच एखाद्या सार्वजनिक वाचनालयासाठी करण्यात येणार असल्याची माहिती खरे कुटुंबीयांनी दिली.

# देवगाव येथील इंदिरानगर च्या अंगणवाडी केन्द्रात पोषण आहारात मृत पक्षी झेडपीच्या अधिकार्यांची धाव

पंचनामा करून नमुने प्रयोगशाळेत पाठविणार

नाशिक प्रतिनिधी

नाशिक -: निफाड तालुक्यातील देवगाव बिट क्र. २ मधील इंदिरानगर अंगणवाडी केंद्रात वितरित करण्यात आलेल्या घरपोच पोषण आहाराच्या बंद पाकिटात मृत पक्षी आढळल्यानेपरीसरात सताप व्यक्त असताना जिल्हा परिषद प्रशासनाने तातडीने दखल घेत रविवारी (दि. १९) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी तसेच महिला व बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.



इंदिरानगर अंगणवाडी केंद्रातून जुलै-ऑगस्ट २०२६ या कालावधीतील पोषण आहाराचे वाटप लाभार्थी प्रिन्स सुखदेव माळी व गणेश सुखदेव माळी यांना १४ जुलै रोजी करण्यात आले होते. १८ जुलै रोजी त्यांच्या आई पूजा माळी यांनी आहार तयार करण्यासाठी पाकीट उघडले असता त्यामध्ये मृत पक्षी आढळून आला. यानंतर ही बाब तत्काळ संबंधित अंगणवाडी सेविकेच्या निदर्शनास आणून देण्यात आली.

जिल्हा परीषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रताप पाटील, बालविकास प्रकल्प अधिकारी तसेच महिला व बालविकास विभागाचे अधिकारी कोंडार यांनी घटनास्थळी भेट देऊन सविस्तर पाहणी केली.

जिल्हा परिषद प्रशासनाने तातडीने दखल घेतली. अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला, नमुने जप्त करून प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्याचे आदेश दिले. आता प्रयोगशाळेच्या अहवालानंतर पुढील कारवाई होणार आहे.

माजी सरपच विनोद जोशी, माजी सरपंच वैशाली अडांगळे, प्रशांत कुलकर्णी, मनोहर बोचरे, राजेंद्र मेमाणे, लहानू मेमाणे, तुकाराम बोचरे, पूजा माळी, सुखदेव माळी आदी ग्रामस्थांच्या उपस्थितीत संबंधित पोषण आहाराच्या पाकिटाचा पंचनामा करण्यात आला.

तूरडाळ-तांदूळ रिमिक्स (बैंच क्रमांक एम.डी. के. बी ०२-०६, उत्पादन दिनांक ११ जून २०२६) या पोषण आहाराचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्याचे निर्देश देण्यात आले.तसेच देवगावमधील सर्व अंगणवाडी केंद्रांमध्ये शिल्लक असलेल्या पोषण आहाराचे नमुनेही तपासणीसाठी पाठविण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. घटनेचा सविस्तर अहवाल वरिष्ठांकडे सादर करण्यात येणार असून प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल, असे महिला व बालविकास विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.

# कर्तव्यदक्ष पो नी. विश्वंभर पल्लेवाड रुजू होताच बनाव आत्महत्येचा केला पर्दाफाश

जन्मदात्या आईसह तिघांकडून मुलाची हत्या

भोकर । प्रतिनिधी

भोकर तालुक्यातील मौजे डोर येथील रहिवासी व सध्या भोकर शहरातील अशोकनगर परिसरात वास्तव्यास असलेल्या जिंके कुटुंबातील एका तरुणाचा मृत्यू सुरुवातीला आत्महत्या असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, भोकर पोलिसांच्या तपासात हा प्रकार प्रत्यक्षात खून असल्याचे समोर आले आहे.

संबंधित तरुणाचा मृतदेह किनवट रोडवरील सुदा प्रकल्प परिसरातील काटेरी झुडपात आढळून आला होता. कुटुंबीयांनी तो दारू व अन्य व्यसनांच्या आहारी गेला होता आणि त्याने आत्महत्या केली असल्याची माहिती दिल्याने भोकर पोलिसांनी सुरुवातीला आकस्मिक मृत्यूची नोंद केली होती.

दरम्यान, पंचनामा व प्राथमिक चौकशीदरम्यान भोकर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विश्वंभर पलेवाड यांनी नातेवाईकांकडे विचारपूस केली असता त्यांच्या जबाबात विसंगती आढळली. त्यामुळे मृत्यूबाबत संशय निर्माण झाला. त्यानंतर पोलिसांनी सखोल तपास सुरू केला.

तपासादरम्यान, मृत तरुणाची आई, सख्खा भाऊ आणि मेहुणा यांनी संगनमत करून घरातच त्याचा गळा आवळून खून केल्याची बाब समोर आली. त्यानंतर पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह मध्यरात्रीच्या सुमारास किनवट रोडवरील सुदा प्रकल्प परिसरातील काटेरी झुडपात टाकल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणात संबंधित तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास भोकर



पोलीस करीत आहेत.

अवघ्या एका महिन्यापूर्वी भोकर पोलीस ठाण्याचा कार्यभार स्वीकारलेल्या पोलीस निरीक्षक विश्वंभर पलेवाड यांनी संशयास्पद बाबींचा वेध घेत या गुंतागुंतीच्या प्रकरणाचा उलगडा केल्याने त्यांच्या तपास कौशल्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# लोकसहभागातून केज मधील तो धोकादायक रस्ता झाला चकाचक!

## शिक्षक कॉलनीतील जागरूक नागरिकांचे कौतुकास्पद पाऊल; स्वतः खर्च आणि श्रमदान करून बुजवले धोकादायक खड्डे

केज/प्रतिनिधी

प्रशासनाची वाट पाहण्यापेक्षा आपली गल्ली आणि आपला रस्ता या भावनेतून काय साध्य होऊ शकते,याचे एक उत्तम उदाहरण केज शहरा तील शिक्षक कॉलनी भागात पाहायला मिळालं आहे.बीड राष्ट्रीय महामार्ग ते राष्ट्रसंत भगवान बाबा मंदिर,शिक्षक कॉलनी या गल्लीतील अत्यंत धोकादायक बनलेला रस्ता अखेर लोक सहभागातून दुरुस्त करण्यात आला असून, यामुळे वाहनधारक आणि भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

वाहनधारकांचा मनस्ताप अन् अपघाताची भीती टळली

बीड राष्ट्रीय महामार्ग आणि 'चाय कट्टा हॉटेल'समोरील रस्त्यावर गेल्या अनेक दिवसांपासून मोठे आणि धोकादायक खड्डे पडले होते.या खड्ड्यामुळे दुचाकी, चारचाकी आणि इतर मोठ्या वाहनधारकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत होता. तसेच या ठिकाणी सतत छोट्या-मोठ्या अपघातांचा धोका निर्माण झाला होता. राष्ट्रसंत भगवान बाबांच्या दर्शनासाठी येणारे भाविक



आणि स्थानिक नागरिक यामुळे त्रस्त झाले होते.

लोकसहभाग आणि श्रमदानातून कोंडी फुटली.या समस्येवर प्रशासकीय पातळी वरून तात्काळ हालचाली न झाल्याने, अखेर या भागातील जागरूक व कर्तव्यदक्ष नागरिकांनी स्वतःहून पुढाकार घेण्याचे ठरवले.शासकीय निधीची किंवा प्रशासनाची वाट न पाहता,सर्वांनी एकत्र येत स्वतः खर्च केला आणि श्रमदानाच्या जोरावर हा रस्ता दुरुस्त केला.समोरील धोकादायक खड्डा पूर्णपणे बुजवल्यामुळे आता संभाव्य अपघातांना आळा बसणार असून,भाविक आणि स्थानिकांचा प्रवाससुकर व सुरक्षित झाला आहे.

या समाजोपयोगी आणि कौतुकास्पद कामात मोलाचे सहकार्य आणि योगदान देणारे स्थानिक नागरिक, शिक्षक आणि पत्रकार बांधव पुढे आले. यामध्ये प्रामुख्याने श्री. हनुमंतराव चौरे,श्री. दत्तात्रय धस,श्री. बाबासाहेब केदार सर, श्री.बाबा चौरे मामा, पत्रकार श्री.प्रकाशजी मुंडे,श्री.सोनू भैया धस, श्री.नवनाथ घुले,वैभव केंद्रे,बाबासाहेब मुंडे सर,डॉ.डापकर साहेब, गोटू भैया पाळवदे, जालिंदर बारगजे, श्रीकृष्ण तात्या घुले सर,आशीष केदार आणि त्यांच्यासोबत इतर सर्व सहकारी मित्रांचा समावेश आहे. या सर्व सन्माननीयांचे संपूर्ण परिसरातील जनतेकडून मनःपूर्वक आभार मानले जात असून,त्यांच्या या सामाजिक जाणिवेचे सर्वत्र कौतुक होत आहे.कामातून माणूस मोठा होतो आणि अशा माणसांमुळे समाज सुरक्षित होतो! हाच संदेश या कृतीतून केज शहरामधील नागरिकांनी दिला असून,त्यांच्या या कार्याचे संपूर्ण परिसरातील जनते मधून कौतुक केले जात आहे.

# शिरूर तालुक्यात प्रथमच फार्मर कप स्पर्धा ! शेतकरी गटाचा उत्स्फुर्त प्रतिसाद!

## शेतकरी आधुनिक आणि शास्वत शेती पध्दती करू लागले आत्मसात !

मानूर ।प्रतिनिधी

कमी पर्जन्यमान , सतत पाणी दुर्भिक्ष परिणामी बारमाही बागायतीचे क्षेत्र कमी मात्र आता हे चित्र बदलण्यासाठी पाणी फाऊंडेशन ने प्रथमच फार्मर कप स्पर्धचे आयोजन केले असुन शेतकरी सुध्दा शाश्वत शेतीचे तंत्र आत्मसात करू लागल्याने शिरूर तालुक्याचे शेतीचे चित्र बदलण्यास निश्चितच कारणीभुत ठरणार आहे .

पारंपारीक शेती पध्दती , अपुरे जलसिंचन , बागयती क्षेत्र तोकडे परिणामी चार सहा महिणे ऊस तोडीसाठी स्थलांतर हे विदारक चित्र बदलण्यासाठी आता पाणी फाऊंडेशन ने प्रथमच फार्मर कप स्पर्धा आयोजित केली असुन शेतकरी सुध्दा शाश्वत शेतीचे तंत्र आत्मसात करण्यास प्रतिसाद देत आहे .

बेडवर कापुस लागवड , बीज प्रक्रिया करून पेरणी , चिकट सापळे , कामगंध सापळे या सारख्या उपाय योजना शेतकरी स्वतः हून पुढाकार घेऊ लागला



.

शेतकरी गटांचा सहभाग !

भुवनेश्वर महिला शेतकरी गट रायमोह ,संकल्प शेतकरी गट व जालिंदर शेतकरी गट तागडगांव ,भुमाता महिला शेतकरी गट वारणी आणि हिरकणी महिला शेतकरी गट उंबरमुळी यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला आहे .

एरव्ही शेतकरी अधिकारी पदाधिकारी यांचे सत्कार करत होता मात्र आता शेतकऱ्यांचा सन्मान करण्यासाठी अधिकारी स्वतः हून त्यांच्या बांधावर पोहचले . या दौऱ्यात विभागिय कृषी सहसंचालक छत्रपती संभाजी नगरचे सुनिल वानखेडे यांनी व्हिडीओ कॉल द्वारे शेतकरी गटाशी संवाद साधत फार्मर कप स्पर्धेसाठी प्रोत्साहित केले . दरम्यान जिल्हा उपसंचालक कृषी विभाग दादाराव जाधवर यांनी सपत्निक दौरा करून शेतक-यांचा सत्कार केला शिवाय शेतकरी महिलाची खण नारळानी ओटी भरून सन्मान केला .

या दौऱ्यात उमेद अभियानचे मेंटर गुंड , कृषी विभाग शिरूरच्या कविता ढाकणे , पाणी फाऊंडेशनचे विनोद ठोंबरे , विशाल घोलप वैष्णवी मस्के आदिची उपस्थिती होती .

# अजितदादा पवार यांच्या जयंती निमित्त

## प्रभाग क्र. २ मध्ये घरपोच मिळणार आयुष्मान भारत कार्ड व रेशन कार्ड सेवा – नितीन शिनगारे

किल्ले धारूर (प्रतिनिधी)

अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त गटनेते नितीन शिनगारे व जयसिंग भैय्या सोळंके सेवा प्रतिष्ठानचा उपक्रम २२ ते २६ जुलैदरम्यान विशेष शिबिर आयोजित करण्यात आले आहे.



उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त जयसिंग भैय्या सोळंके सेवा प्रतिष्ठान व गटनेते नितीन शिनगारे यांच्या पुढाकारातून प्रभाग क्रमांक २ मधील नागरिकांसाठी लोकहिताचा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. २२ ते २६ जुलै २०२६ या कालावधीत नागरिकांना मोफत आयुष्मान भारत कार्ड, घरपोच रेशन कार्ड सेवा तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी अपघाती विमा उपलब्ध करून दिला जाणार आहे.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे नागरिकांना सरकारी कार्यालये किंवा शिबिरात रांगेत उभे राहण्याची गरज भासणार नाही. आयोजकांचे प्रतिनिधी थेट नागरिकांच्या घरी जाऊन आवश्यक कागदपत्रे स्वीकारतील आणि पुढील प्रक्रिया पूर्ण करतील. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला आणि कामगार वर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे.


आयुष्मान भारत योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अंगीकृत रुग्णालयांमध्ये दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचाराची सुविधा मिळणार असल्याने या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

लागणारे कागदपत्र . आधारकार्ड, १२ अंकी राशन कार्ड नंबर, आधार कार्डशी लिंक असलेला मोबाईल नंबर मुख्य आयोजन गटनेते नितीन शिवाजीराव शिनगारे असून अधिक माहितीसाठी आश्विन गुळवे मो.९७३०७२३०९८ व रेहान शेख ९६९९१९३७९९ यांच्याशी संपर्क करावा.या सुवर्णसंधीचा लाभ घेण्याचे आव्हान आयोजक गटनेते शिनगारे यांनी केले आहे

# बीड नगर परिषदेतील प्रतिनिधींकडून सतत महिन्यांच्या गनतीची उजळणी मनाने नाही तर निदान दाखविल्यावर तरी कामे करा – एस.एम.युसूफ़

बीड (प्रतिनिधी)

शहरातील अस्वच्छता, तुडुंब भरलेल्या नाल्या, अनियमित पाणीपुरवठा, बंद पडलेल्या पथदिव्यांचे प्रश्न, काहीही असो बीड शहरवासीयांनी नगरपालिकेत जाऊन याबद्दल काहीही सांगितले तरी सत्ताधारी असो की विरोधी पक्षातील असो सगळेच जण आम्हाला निवडून येऊन एवढेच महिने झाले, अशी महिन्यांची उजळणी करू लागले आहेत. हे पाहता मनाने नाही तर निदान दाखविल्यावर तरी कामे करा असे आवाहन मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.याविषयी दिलेल्या प्रसिद्धिपत्रकात नमूद केले आहे की, बीड नगर परिषदेतील सत्ताधारी, विरोधी किंवा प्रशासन यांची अवस्था ही नाचता येईना अंगण वाकडे सारखी झाली आहे. काम करणाऱ्याला महिने, वर्षे तर लांबची गोष्ट आहे, काही दिवसच पुरेसे असतात. फक्त त्याच्या अंतर्मनात काम करायची धमक असली पाहिजे. हीच धमक अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे साहेब दाखवीत असल्याने त्या खात्याशी संबंधित असलेले उद्योग-व्यवहार हळूहळू वठणीवर येऊ लागले आहेत. त्यांना अन्न व औषध प्रशासन आयुक्त पद स्वीकारून किती वर्षे झाली? जेमतेम काही महिने परंतु एक उच्चपदस्थ



अधिकारी म्हणून त्यांच्यात असलेली धमक त्यांनी अल्पकाळात दाखवून दिली. अशी धमक बीड शहरासाठी जनतेने निवडून पाठविलेले बीड नगर परिषदेतील प्रतिनिधी आणि प्रशासन कधी दाखवणार? शहरातील लोकोपयोगी कामे करताना आम्हाला निवडून येऊन एवढेच महिने झाले अशी उजळणी करणारे प्रतिनिधी स्वलाभासाठी मात्र सराईतपणे व तरबेजतेने स्वतःच्या आर्थिक लाभाचे व्यवहार करू लागले आहेत. स्वतःसाठी त्यांना आम्ही नवीन आहोत आम्हाला निवडून येऊन एवढेच महिने झालेत असे सांगण्याची वेळ येत नाही. दुसरीकडे शहरवासीयांच्या कामासाठी मात्र तेच प्रतिनिधी महिन्यांची उजळणी करू लागले आहेत. अशाप्रकारे उजळणी करणाऱ्यांमध्ये फक्त पहिल्यांदाच नाही तर दोन ते पाच वेळा निवडून येणारे अनेक महाभाग सुद्धा आहेत. त्यांना शहरातील प्रश्नांची, समस्यांची माहितीही आहे. अशांनी निदान आपल्या ज्येष्ठतेला साजेल असे बोलावे आणि त्याप्रमाणे काम करावे. ज्येष्ठांसह प्रथम निवडून आलेल्यांनीही मनाने नाही तर निदान शहरवासीयांनी दाखवून दिल्यावर तरी कामे करावीत असे आवाहन या अनुषंगाने मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़

# आमदार सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला यश; आष्टीचे नवीन बसस्थानक सेवेस सज्ज, प्रवाशांच्या प्रतीक्षेला अखेर पूर्णविराम..!

## अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर विकासाचे चक्र गतिमान; आता आष्टीला आधुनिक, स्वच्छ, डिजिटल आणि आदर्श बसस्थानकाची अपेक्षा

आष्टी (अण्णासाहेब साबळे)

आष्टी शहराच्या विकासाशी आणि हजारो प्रवाशांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेला नवीन राज्य परिवहन बसस्थानकाचा बहुप्रतीक्षित प्रश्न अखेर मार्गी लागण्याच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या या प्रकल्पाला आता प्रत्यक्ष गती मिळत असून, आमदार सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि संबंधित विभागांच्या समन्वयातून बसस्थानक सुरू करण्याच्या प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचल्या आहेत.



वर्षानुवर्षे जुन्या बसस्थानकातील अपुऱ्या सुविधा, अस्वच्छता, गर्दी, धूळ, चिखल आणि गैरसोयींचा सामना करणाऱ्या प्रवाशांसाठी ही बातमी मोठा दिलासा देणारी ठरत आहे. विद्यार्थी, शेतकरी, कामगार, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामीण भागातील प्रवासी यांना दररोज भेडसावणाऱ्या अडचणी आता इतिहासजमा होण्याची आशा निर्माण झाली आहे.

नवीन बसस्थानक हे केवळ प्रवासी वाहतुकीचे केंद्र नसून आष्टीच्या बदलत्या विकासदृष्टीचे प्रतीक ठरणार आहे. दि. ५ जुलै रोजी आमदार सुरेश धस यांनी अधिकाऱ्यांना कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्यानंतर प्रशासकीय यंत्रणा अधिक वेगाने कार्यरत झाली. त्यानंतर झालेल्या पाहणीत विद्युत विभागाची सर्व कामे पूर्ण झाल्याचे स्पष्ट झाले असून उर्वरित किरकोळ कामेही पूर्णत्वाकडे वाटचाल करत आहेत.

विशेष म्हणजे हा प्रकल्प केवळ एका विभागाचा किंवा एका व्यक्तीचा नसून अनेक वर्षांच्या काळात विविध स्तरांवर झालेल्या प्रयत्नांचे फलित असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. लोकप्रतिनिधी, प्रशासन, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक यांच्या अपेक्षांचे केंद्रबिंदू बनलेले हे बसस्थानक आता प्रत्यक्ष सेवेत येण्याच्या मार्गावर आहे.

मात्र आष्टीकरांच्या अपेक्षा यापुढे आणखी मोठ्या आहेत. बसस्थानक सुरू होणे हा शेवट नसून विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात असल्याचे नागरिकांचे मत आहे. बसस्थानक परिसरात आधुनिक डिजिटल माहिती प्रणाली, सीसीटीव्ही सुरक्षा व्यवस्था, स्वच्छ आणि सुसज्ज प्रतीक्षागृह, आकर्षक प्रकाशयोजना, हरित परिसर, दिव्यांगस्नेही सुविधा, महिलांसाठी स्वतंत्र सुविधा आणि कायमस्वरूपी स्वच्छता व्यवस्थापन यांचा समावेश व्हावा, अशी मागणी जोर धरत आहे.

आष्टी हे तालुक्याचे व्यापारी, शैक्षणिक आणि प्रशासकीय केंद्र म्हणून झपाट्याने विकसित होत असताना, येथील बसस्थानकही त्या विकासदृष्टीला साजेसे असणे काळाची गरज असल्याचे मत जाणकार व्यक्त करत आहेत. आज राज्यातील अनेक तालुक्यांमध्ये आधुनिक सुविधा उपलब्ध होत असताना आष्टीनेही विकासाच्या या शर्यतीत आघाडीवर राहावे, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

लोकभावना

नागरिकांचे म्हणणे आहे की, रखडलेली कामे पूर्ण होणे ही निश्चितच समाधानाची बाब आहे; मात्र खरा आनंद तेव्हाच मिळेल जेव्हा बसस्थानक स्वच्छता, सुविधा, सुरक्षा आणि व्यवस्थापनाच्या बाबतीत जिल्ह्यात आदर्श ठरेल. विकासकामांचे खरे मूल्यमापन उद्घाटनाच्या फितीने होत नाही, तर त्या सुविधेचा लाभ घेणाऱ्या सामान्य नागरिकांच्या चेहऱ्यावर उमटणाऱ्या समाधानाने होत असते.

आज आष्टीकरांना कोणावर टीका नको आहे, तर विकासाची गती हवी आहे. कोणाचे श्रेय मोठे आणि कोणाचे लहान यापेक्षा आष्टीचा विकास मोठा व्हावा, हीच जनतेची अपेक्षा आहे. कारण राजकारणाचा कालावधी मर्यादित असतो, परंतु विकासकामांचा लाभ अनेक पिढ्यांना मिळत असतो.

नवीन बसस्थानकाचे दरवाजे प्रवाशांसाठी खुलले, परिसर सुशोभित झाला, डिजिटल सुविधा उपलब्ध झाल्या आणि स्वच्छता कायम राखली गेली, तर हे बसस्थानक केवळ वाहतुकीचे केंद्र राहणार नाही; तर आष्टीच्या प्रगतीची, नियोजनाची आणि विकासाभिमुख विचारांची ओळख बनणार आहे. याच अपेक्षेने आज संपूर्ण आष्टी तालुक्याचे लक्ष या बहुप्रतीक्षित प्रकल्पाकडे लागले आहे.



# राज्यात पावसाची हजेरी; अजिंठा परिसरात दुबार पेरणीचे संकट

## पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली; शेतकरी चिंतेत

छत्रपती संभाजीनगर/सुनील वैद्य
(दैनिक मराठवाडा दर्शन)

राज्यातील अनेक भागांत दमदार पावसाने हजेरी लावून नद्या-नाले वाहू लागले असतानाच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अजिंठा परिसर मात्र अद्यापही समाधानकारक पावसाच्या प्रतीक्षेत आहे. विशेषतः अजिंठा लेणी परिसर, पिंपळदरी, मुखपाट आणि अजिंठा शिवारात अपेक्षित पाऊस न झाल्याने खरीप हंगामातील पिके संकटात सापडली आहेत. पावसाअभावी अनेक ठिकाणी दुबार पेरणीचे संकट निर्माण झाले असून शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

जून महिन्यात झालेल्या तुरळक पावसावर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी सोयाबीन, कापूस, तूर, मका आदी पिकांची पेरणी केली. मात्र त्यानंतर पावसाने दडी मारल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला. त्यामुळे उगवलेली पिके वाढू शकली नाहीत. अनेक ठिकाणी रोपे पिवळी पडू लागली असून काही ठिकाणी पिके सुकण्याच्या मार्गावर आहेत.

पाऊस वेळेत न झाल्यास दुबार पेरणी शिवाय पर्याय राहणार नसल्याचे शेतकरी सांगत आहेत. मात्र बियाणे, खत आणि मशागतीवर आधीच मोठा खर्च झाल्याने पुन्हा पेरणी करणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. वाढते उत्पादन खर्च, कर्जाचा बोजा आणि अनिश्चित हवामानामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे.

हवामान खात्याने येत्या काही दिवसांत पावसाची शक्यता व्यक्त केली असली तरी शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहेत. तातडीने चांगला पाऊस झाला तर पिकांना नवसंजीवनी मिळू शकते; अन्यथा खरीप हंगामाचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे.

# आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरसाठी सिल्लोड आगाराची विशेष एसटी बस सेवा

छत्रपती संभाजीनगर / सुनील वैद्य (दैनिक मराठवाडा दर्शन)

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या वारकरी व भाविकांसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सिल्लोड आगारातर्फे विशेष एसटी बस सेवेचे नियोजन करण्यात आले आहे. गावातून ४० किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांची नोंदणी झाल्यास, त्या गावातून थेट पंढरपूरपर्यंत जाण्या-येण्यासाठी विशेष बस उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती आगार प्रशासनाने दिली आहे.




या उपक्रमामुळे भाविकांना सुरक्षित, आरामदायी आणि नियोजनबद्ध प्रवासाची सुविधा मिळणार असून, सामूहिकरीत्या पंढरपूर यात्रेला जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी ही योजना उपयुक्त ठरणार आहे. ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक तसेच वारकरी मंडळांनी आपल्या गावातील भाविकांची नोंदणी करून एसटी महामंडळाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी सिल्लोड आगार प्रमुख सागरकुमार कुरील (मो. ९४०४५३१४५४), वाहतूक निरीक्षक सतीश अंभोरे (मो. ८८३०००९२८१), तसेच संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे.

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर जास्तीत जास्त भाविकांनी या विशेष बस सेवेचा लाभ घेऊन सुरक्षित आणि सुखकर प्रवास करावा, असे आवाहन सिल्लोड आगार प्रशासनाने केले आहे.

# तारखांचा जादूगार की तर्कशक्तीचा अवलिया?

## जन्मतारीख, वार आणि जीवनाचा वेध सांगणारे राजेंद्र महाराज लोखंडे यांचा ४६ वा वाढदिवस

आष्टी (अण्णासाहेब साबळे) : पाटोदा शहरातील राजेंद्र गंगाराम लोखंडे उर्फ राजेंद्र महाराज लोखंडे हे आपल्या विलक्षण स्मरणशक्ती, तर्कशक्ती आणि अध्यात्मिक अभ्यासामुळे जिल्ह्यासह राज्यभर चर्चेचा विषय ठरत आहेत. जन्मतारीख, वार, भूतकाळातील तसेच भविष्यकाळातील सण-उत्सवांच्या तारखा क्षणार्धात सांगण्याच्या त्यांच्या अनोख्या क्षमतेमुळे त्यांना ओळखले जाते. २२ जुलै १९८० रोजी जन्मलेल्या राजेंद्र महाराजांचा आज ४६ वा वाढदिवस उत्साहात साजरा होत आहे.

जामखेड तालुक्यातील दिघोळ येथील रहिवासी असलेले राजेंद्र लोखंडे हे शिक्षण व रोजगाराच्या निमित्ताने काही वर्षांपूर्वी पाटोदा येथे आले आणि येथेच स्थायिक झाले. लहानपणापासूनच त्यांच्यावर धार्मिक व अध्यात्मिक संस्कार झाल्याने त्यांचा ओढा अध्यात्माकडे राहिला. शालेय जीवनातच त्यांनी अध्यात्माची वाट स्वीकारली होती.

अचूक तारखा सांगण्याची विलक्षण क्षमता



राजेंद्र महाराज यांच्याकडे भूतकाळातील आणि भविष्यकाळातील अनेक वर्षांतील सण, उत्सव आणि विशेष दिवसांच्या तारखा व वार अचूक सांगण्याची अनोखी क्षमता असल्याचे त्यांच्या परिचयातील नागरिक सांगतात. कोणतीही तारीख विचारली असता त्यासोबत त्या दिवसाचा वारही ते सहजपणे सांगतात.

इतकेच नव्हे तर समोर आलेल्या व्यक्तीची जन्मतारीख आणि वार अचूक सांगण्याची त्यांची हातोटी अनेकांना आश्चर्यचकित करते. त्यांच्या या तर्काधारित गणनशक्तीची चर्चा पाटोदा परिसरासह जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर होत असते.

अध्यात्मिक जीवनाची निवड

एम.ए. पर्यंत शिक्षण पूर्ण केलेल्या राजेंद्र महाराज यांनी काही काळ ह.भ.प. रामकृष्ण रंधवे महाराज यांच्या संस्थेत कार्य केले. मात्र सांसारिक जीवनापेक्षा अध्यात्मिक साधनेकडे त्यांचा अधिक कल राहिला. ब्रह्मचर्य स्वीकारून त्यांनी साधेपणाचे जीवन जगण्याचा मार्ग निवडला आहे.

भगवान शंकरावरील त्यांची नितांत श्रद्धा असून अध्यात्म, चिंतन आणि समाजातील विविध घटकांशी संवाद हे त्यांच्या जीवनाचे प्रमुख आधारस्तंभ आहेत.

राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातही चर्चेत

राजकीय, सामाजिक आणि व्यावसायिक क्षेत्रातील अनेक मान्यवर व्यक्ती त्यांची भेट घेत असल्याचे सांगितले जाते. महत्त्वाचे निर्णय घेण्यापूर्वी किंवा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांचा सल्ला घेणाऱ्यांची संख्याही मोठी असल्याची चर्चा परिसरात आहे.

लोकांच्या कुतूहलाचा विषय

आजच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगातही राजेंद्र महाराज लोखंडे यांची स्मरणशक्ती, तारखांवरील प्रभुत्व आणि अध्यात्मिक जीवनशैली यामुळे ते अनेकांच्या कुतूहलाचा विषय ठरले आहेत. त्यांच्या कार्यामुळे पाटोदा परिसरात त्यांना विशेष मानाचे स्थान प्राप्त झाले आहे.

राजेंद्र महाराज लोखंडे यांच्या ४६ व्या वाढदिवसानिमित्त विविध स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून त्यांच्या निरोगी, दीर्घ आणि यशस्वी आयुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

# बीबी का मकबरा परिसरात पर्यटकांशी सौजन्यपूर्ण वर्तनाचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर /सुनील वैद्य
( दैनिक मराठवाडा दर्शन)

बेगमपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ऐतिहासिक व जागतिक कीर्तीचे पर्यटनस्थळ बीबी का मकबरा येथे देश-विदेशासह राज्यातील विविध जिल्ह्यांतून दररोज मोठ्या संख्येने पर्यटक भेट देत असतात. या पार्श्वभूमीवर पर्यटकांना सुरक्षित, स्वच्छ व सकारात्मक वातावरण मिळावे, यासाठी बेगमपुरा पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीणा यादव यांनी ऑटो रिक्षाचालक, छोटे दुकानदार व हातगाडी व्यावसायिक यांच्याशी संवाद साधून मार्गदर्शन केले.



यावेळी सर्वांनी वाहतुकीची शिस्त पाळावी, परिसर स्वच्छ ठेवावा, पर्यटकांशी नम्र व आदराने वागावे, कोणत्याही प्रकारे त्यांची फसवणूक किंवा गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी, तसेच पर्यटनस्थळाची चांगली प्रतिमा कायम राखण्यासाठी सहकार्य करावे, अशा सूचना देण्यात आल्या.पर्यटकांना सुरक्षित, आनंददायी आणि चांगला अनुभव मिळणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असून, प्रत्येकाने जबाबदारीने वागून बीबी का मकबरा परिसराची स्वच्छता, शिस्त आणि प्रतिष्ठा जपावी, असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीणा यादव यांनी केले.

# खंदारे गुरुजींची गुरुवचने





डॉ संगिता पिंगळे
बीड

आपण जेवढी कामे करतो तेवढ्यात प्रभू असणे आवश्यक आहे असे गुरुजी म्हणाले.

आपण जेवढी कामे करतो तेवढ्यात प्रभू असणे आवश्यक आहे असे गुरुजी म्हणाले. साधकाने सद्गुरुंनी दिलेली साधना काटेकोरपणे केली की तात्काळ ईश्वरी अस्तित्व प्रकट झाल्याचे अनुभव येतात. चमत्कार वाटावा असे अनुभव यायला लागतात. नंतर ते अनुभव वारंवार येवू लागतात. जितके आपण दक्ष तितके जास्त अनुभव. गुरुजींनी आपल्याला प्रभू सोबत जोडून दिले आहे ते कायमचे. प्रत्येक कार्य सहज होते अन त्याचा शीणही राहत नाही कारण ते कार्य त्याने केलेले असते आपल्याला माध्यम बनवून. यासाठी जाणीवपूर्वक प्रत्येक कामात त्याला सहभागी करणे आवश्यक आहे. त्यात आवड निवड जमत नाही. त्याला सोबत घेवून केलेली कृती कधी चुकीची होतच नाही म्हणजे अचूकत्त्व येत. थँक्स गुरुजी. सोपे केले आपण त्याला सोबत घेणे. आपला नित्य जयजयकार असो.

# आधार माणुसकीच्या उपक्रमांतर्गत एक हजार मुलांना स्कूल कीट वाटप

## प्रगती साधण्यासाठी शिक्षणाची गरज - जितीन रहमान

अंबाजोगाई(प्रतिनिधी)

समाजाची प्रगती साधायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे मत बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी रविवारी (दि.१९ जुलै रविवार रोजी येथे व्यक्त केले. येथील संत गाडगेबाबा सेवाभावी संस्थांतर्गत आधार माणुसकीचा उपक्रम, विद्यार्थी विकास योजना व पुणे येथील मराठवाडा मित्र मंडळाच्या वतीने बीड, लातूर व धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील एक हजार मुलांना शैक्षणिक साहित्याचे कीट वाटप करण्यात आले. त्याप्रसंगी जितीन रहमान बोलत होते. अध्यक्षस्थानी ठाणे येथील विद्यार्थी विकास योजनेचे संस्थापक रविंद्र कर्वे हे होते. विद्यार्थी विकास योजनेचे अध्यक्ष संजीव करंदीकर, अतिरिक्त पोलिस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस आधिकारी ऋषिकेश




शिंदे, रुई रामेश्वर येथील दादाराव कराड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या कार्यकारी संचालक आशा कराड, पुणे येथील मराठवाडा मित्र मंडळाचे, शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. सौरभ उबाळे, पुणे येथील मराठवाडा मित्र मंडळ संस्थेचे प्रा.रमेश पंडित, वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रा.सौरभ जोशी, ब्रह्मकुमारी प्रज्ञा दीदी, वकील संघाचे अध्यक्ष अशोक कवडे, हृदयरोग तज्ज्ञ डॉ. दिपक कटारे, डॉ. सुनिता तोंडगे, प्रताप भिसे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना रहमान म्हणाले की,बीड हा कष्टकऱ्यांचा जिल्हा आहे. कष्ट हीच माझी प्रेरणा आहे. शिक्षणातही कष्ट केले तरच पुढे जाता येते त्यामुळे समाजाचे चित्र बदलायचे असेल तर हिच प्रेरणा घेऊन पुढे गेले पाहिजे. त्यासाठी शिस्त अंगिकारून माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये आपापल्या क्षेत्रात पारंगत झाले पाहिजे असेही ते म्हणाले

स्वत:ची ओळख निर्माण करण्यासाठी चुकीच्या मार्गाचा अवलंब करू नका, मदतीची भावना ठेवा असे आवाहन ऋषिकेश शिंदे यांनी केले. आपल्याला मिळालेल्या स्कूल कीटच्या माध्यमातून केलेली मदत ही आशेची आणि विश्वासाची आहे. हा विश्वास घेऊन हे विद्यार्थी पुढे जातील असे त्यांनी सांगितले मोठे झाल्यानंतर मातेला व गावच्या मातीला विसरू नका अशी अपेक्षा संजीव करंदीकर यांनी व्यक्त केली. प्रज्ञा दिदी यांनी या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगामध्ये शिक्षणाबरोबरच संस्काराची गरज असल्याचे सांगितले.आधार माणुसकीचा उपक्रमाचे प्रमुख ड. संतोष पवार यांनी या योजनेतून यावर्षी २१ विद्यार्थ्यांचे वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्याचे सांगितले. यावेळी पाहुण्यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात १० विद्यार्थ्यांना स्कूल कीट वाटप झाले. विद्यकीय शिक्षण पूर्ण झालेल्या २१ गुणवंत विद्यार्थ्यांचा भेट वस्तू देऊन गुणगौरव झाला. लाभधारक विद्यार्थी व मातांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन शिवानंद गुळवे यांनी केले. प्रशांत बर्दापूरकर यांनी आभार मानले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब यांनी निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय : दैनिक मराठवाडा दर्शन, माधव नगर, धारूर रोड, केज ता.केज जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY **HANDIBAG DATTATRAY BALASAHEB** AND PUBLISHED BY **HANDIBAG DATTATRAY BALASAHEB** ON BEHALF OF **HANDIBAG DATTATRAY BALASAHEB** AND PRINTED AT NIRMITEE PRINTS, KABAD GALLI, BEED TQ.DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY MARATHWADA DARSHAN, At.MADHAV NAGAR, DHARUR ROAD, KAIJ TQ.KAIJ, DIST.BEED **( MAHARSHTRA )**.
EDITOR- **HANDIBAG DATTATRAY BALASAHEB**